महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-१७१८/प्र.क्र.३/ऋण व हमी कक्ष

ऋण व हमी सनियंत्रण कक्ष
वित्त विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८/०१/२०१८.

संदर्भ :

१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही २००४/प्र.क्र.१५/१२, दिनांक २५/०५/२००६.
२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.पीओडी १००७/प्र.क्र.९/१८(र.व.का), दिनांक १४/११/२०१३.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण २०१२/प्र.क्र.५४/१८(र.व.का), दिनांक ११/८/२०१४.

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा राज्यात लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम ९ (२) नुसार प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख त्या कार्यालयाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या सादर करण्यासाठी शक्यतो अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करील अशी तरतूद आहे.

त्यानुषंगाने ऋण व हमी सनियंत्रण कक्ष कार्यासनाशी संबंधित विषयाच्या बाबतीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास परिपत्रकात नमूद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०११८११३४२३६५०५ असा आहे. हा कार्यालयीन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Walter Cajetan Dmello

Digitally signed by Walter Cajetan Dmello
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15523aa80438dadfcf951b188414eb757c358470bc55b163469bb9cb85bbe50f, serialNumber=20c05674761ef3e1c5207a659b4f2d7699be3df29369f399531d1fa92b517391, cn=Walter Cajetan Dmello
Date: 2018.01.19 12:51:48 +05'30'

(वॉल्टर डिमेलो)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
२) अपर मुख्य सचिव (वि.सु.) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
३) उपसचिव (ऋण व हमी सनियंत्रण कक्ष), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) उपसचिव (प्रशासन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) अवर सचिव (प्रशा-२), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) निवडनस्ती.

कार्यालयीन आदेश क्र. संकीर्ण १७१८/प्र.क्र.३/ऋण व हमी सनियंत्रण कक्ष, दि.१८.०१.२०१८ सोबतचे विवरणपत्र

शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील कलम ९(२) नुसार कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करण्याबाबत
अधिकारांचे तीन स्तर निर्धारित करणे

अ.क्र.	कार्यासनाकडून हाताळले जाणारे कामकाज	सादरीकरणाचे तीन स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश निर्गमित करण्यास सक्षम प्राधिकारी
१	२	३	४	५	६	७
१	वित्त विभागातील अर्थबळ, अर्थोपाय व पूर्वीचे अर्थसंकल्प ७ या कार्यासनानी उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीचे (मुद्दल + व्याज यासह) लेखे आणि वसूलीचे मासिक विवरणपत्र अद्ययावत ठेवणे.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.	उ.स.
२	राज्य शासनाने उभारलेल्या कर्जाचे (मुद्दल + व्याज यासह) अद्ययावत लेखे ठेवणे तसेच यासंदर्भातील माहितीचे संकलन करणे.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.	उ.स.
३	केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कर्जाचे (मुद्दल + व्याज यासह) अद्ययावत लेखे ठेवणे.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.	उ.स.
४	राज्य शासनाने विविध मंत्रालयीन विभागामार्फत दिलेले कर्ज तसेच भागभांडवल गुंतवणूक याबाबतचे (मुद्दल + व्याज यासह) अद्ययावत लेखे ठेवणे.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.	उ.स.
५	घरबांधणी अग्रिमाचा पोर्टफोलिओ विकण्याच्या माध्यमातून निधीची उभारणी.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.	उ.स.
६	हमी विषयक नोंदवह्या ठेवणे, मागील वर्षात १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत शासनाने दिलेल्या हमीची माहिती दर्शविणारे विवरणपत्र विधानमंडळाला सादर करणे.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	मा. मंत्री (वित्त)/ मा. मुख्यमंत्री	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.
७	शासनामार्फत देण्यात आलेल्या सर्व हमी प्रकरणात करार करणे, ऋण देणाऱ्या संस्थेकडून सहामाही प्राप्त करून घेणे व त्याची तपासणी करणे, ज्या संस्थेसाठी हमी घेण्यात आलेली आहे त्याचे लेखे उपलब्ध करून घेऊन त्यावर सनियंत्रण ठेवणे.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.	उ.स.
८	शासकीय हमी शुल्कासंदर्भात मागणीपत्र पाठविणे तसेच तदनुषंगाने नोंदवही ठेवणे आणि वसुलीवर देखरेख ठेवणे.	स.संचा.	अ.स.	उ.स./ स.स.	सचिव/ प्र.स./ अ.मु.स.	उ.स.

****